# बृहन्मुंबई महानगरपालिका

## जाहिरात

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अंतर्गत प्रमुख रुग्णालये, विशेष रुग्णालये व सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत उपनगरीय रुग्णालये व प्रसुतिगृहे यांच्या आस्थापनेवरील खालील तक्त्यात नमूद केलेली परिचारीका या संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका परिचर्या शाळेतून General Nursing & Midwifery Diploma उत्तीर्ण झालेल्या व इतर मान्यताप्राप्त परिचर्या शाळेतून General Nursing & Midwifery Diploma उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांकडून परिचारिका पदासाठी दि.28.04.2018 पासून दि.14.05.2018 पर्यंत कार्यालयीन वेळेत सार्वजनिक व साप्ताहिक सुट्टी वगळून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**अर्ज स्विकारण्याचा दिनांक पासूनः-28/04/2018 अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक ःः-14/05/2018 पर्यंत**

**(सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत)**

**अर्ज स्विकारण्याचे ठिकाण ःः-**

कार्यकारी आरोग्य अधिकारी यांचे कार्यालय,

एफ/दक्षिण विभाग कार्यालय इमारत, 3 रा मजला,

आवक-जावक विभाग, रुम क्रमांक 56,

डॉ.आंबेडकर मार्ग, परळ, मुंबई- 400 012

**पदाचे नांव - परिचारीका ( एकूण रिक्त पदे - 867 )**

1. **एकूण रिक्त पदांपैकी 90% पदे फक्त बृहन्मुंबई महानगरपालिका परिचर्या शाळेतून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांसाठी**

| पदाचे नाव/ वर्ग | एकूण रिक्त जागा | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| परिचारीका | 779 | 104 | 71 | 23 | 16 | 17 | 10 | 11 | 121 | 406 |

02.**एकूण रिक्त पदांपैकी 10%पदे बृहन्मुंबई महानगरपालिका व इतर मान्यताप्राप्त परिचर्या शाळेतून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांसाठी**

| पदाचे नाव /वर्ग | एकूण रिक्त जागा | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| परिचारीका | 88 | 10 | 08 | 02 | 02 | 03 | 01 | 02 | 13 | 47 |

तक्ता 'अ' नुसार कप्पीकृत आरक्षण खालीलप्रमाणे

| रुग्णालयाचे नाव | कप्पीकृत आरक्षण | प्रवर्ग | | | | | | | | | एकूण रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | |
| प्रमुख व विशेष रुग्णालये व सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत उपनगरीय रुग्णालये व प्रसुतिगृहे | **सर्वसाधारण** | 98 | 68 | 21 | 16 | 17 | 10 | 11 | 114 | 380 | 735 |
| | **5% खेळाडू** | 06 | 03 | 02 | 0 | 0 | 0 | 0 | 07 | 21 | 39 |
| | **1% अनाथ** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 05 | 05 |
| | एकूण | 104 | 71 | 23 | 16 | 17 | 10 | 11 | 121 | 406 | **779** |
| | **★ नि:समर्थ (अपंग) 3%** | **OL (One leg) "One Leg"** अपंगत्व मान्य आहे. परंतु परिचारीकांची कर्तव्ये व जबाबदारी पार पाडत असतांना त्यांनी **Prosthesis** चा वापर करुन जर परावलंबी राहत नसतील तर ते **Accepted** आहे. | | | | | | | | | **133** |
| ★ प्रवर्गनिहाय नि:समर्थ असलेल्या व्यक्ति (Person with Disabilities) उमेदवारांकरीता आरक्षित असलेली उपरोक्त नमूद **133** पदे आरक्षित प्रवर्गातून तसेच खुल्या गटातून, उमेदवारांच्या उपलब्धतेनुसार भरण्यात येतील. | | | | | | | | | | | |

**<u>तक्ता 'ब'</u>**

**ब) एकूण रिक्त पदांपैकी 10% पदे बृहन्मुंबई महानगरपालिका व इतर मान्यताप्राप्त परिचर्या शाळेतून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांसाठी**

| रुग्णालयाचे नाव | कप्पीकृत आरक्षण | प्रवर्ग | | | | | | | | | एकूण रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | |
| प्रमुख व विशेष रुग्णालये व सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत उपनगरीय रुग्णालये व प्रसुतिगृहे | **सर्वसाधारण** | 09 | 08 | 02 | 02 | 03 | 01 | 02 | 11 | 45 | 83 |
| | **5% खेळाडू** | 01 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 02 | 02 | 05 |
| | **1% अनाथ** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | **एकूण** | 10 | **08** | 02 | 02 | 03 | 01 | **02** | **13** | 47 | 88 |
| **★ नि:समर्थ (अपंग) 3%OL (One leg)** | | **OL (One leg)"One Leg"** अपंगत्व मान्य आहे. परंतु परिचारीकांची कर्तव्ये व जबाबदारी पार पाडत असतांना त्यांनी **Prosthesis** चा वापर करुन जर परावलंबी राहत नसतील तर ते **Accepted** आहे. | | | | | | | | | **15** |
| ★ प्रवर्गनिहाय नि:समर्थ असलेल्या व्यक्ति (Person with Disabilities) उमेदवारांकरीता आरक्षित असलेली उपरोक्त नमूद **15** पदे | | | | | | | | | | | |

| |
|---|
| आरक्षित प्रवर्गातून तसेच खुल्या गटातून, उमेदवारांच्या उपलब्धतेनुसार भरण्यात येतील |

**1)(अ) शैक्षणिक अर्हताः**

1) उमेदवार मान्यताप्राप्त मंडळाची उच्च माध्यमिक शालांत परिक्षा इयत्ता 12 वी (10+2) परिक्षा उत्तीर्ण झालेला असावा.

2)उमेदवार जनरल नर्सिंग अधिक मिडवायफरी डिप्लोमाधारक असावा. (3 किंवा 3 ½ वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण उत्तीर्ण झालेला असावा.)

3)उमेदवार महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलकडून नोंदणीकृत असावा व नोंदणीचे नूतनीकरण केलेले असावे.

4)उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा किंवा तत्सम किंवा उच्चतम परिक्षेत किमान 50 गुणांचा मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला

असावा.

5)उमेदवार 'डीओईएसीसी' सोसायटीचे 'सीसीसी' किंवा 'ओ' स्तर किंवा 'ए' स्तर किंवा'बी' स्तर किंवा 'सी' या स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाच्या 'एमएससीआयटी' किंवा 'जीईसीटीचे' प्रमाणपत्र धारक असावा किवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सुट देण्याकरिता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी/वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पुर्ण केलेला असावा, तथापि नियुक्तीच्या वेळेस उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने/तिने शाासनाने विहित केलेली एमएस-सीआयटीची परिक्षा नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा उमेदवाराची सेवा समाप्त करण्यात येईल.

2) वयोमर्यादा: 1) खुल्या व मागासवर्गीय उमेदवाराचे दिनांक-28.04.2018 रोजी वय 38 वर्षापेक्षा अधिक असू नये.

2) निःसमर्थ (अपंग) उमेदवारांची कमाल वयोमर्यादा महाराष्ट्र शासन निर्देशानुसार 45 वर्षे राहिल.

3) शासननिर्णयानुसार खेळाडूंची गुणवत्ता व पात्रता विचारात घेता सदर पदासाठी असलेली वयोमर्यादा 5 वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल

3) वेतनश्रेणी: 9300 – 34800 + ग्रेड पे रु.4200/- अधिक अनुज्ञेय भत्ते

<u>निवडीचे निकषः-</u>

**अ) एकूण रिक्त पदांपैकी 90% पदे फक्त बृहन्मुंबई महानगरपालिका परिचर्या शाळेतून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांसाठी निवडीचे निकष खालीलप्रमाणे:-**

बृहन्मुंबई महानगरपालिका परिचर्या शाळेतून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांमधून पदाच्या सेवा प्रवेश नियमानुसार विहित केलेली अर्हता, अटी व शर्ती धारण करीत असलेल्या उमेवारांमधून त्यांच्या उत्तीर्ण वर्ष व गुणवत्तेनुसार उमेदवारांची निवडयादी तयार करण्यात येईल.

**ब) एकूण रिक्त पदांपैकी 10% पदे बृहन्मुंबई महानगरपालिका व इतर मान्यताप्राप्त परिचर्या शाळेतून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांसाठी निवडीचे निकष खालीलप्रमाणे:-**

बृहन्मुंबई महानगरपालिका परिचर्या शाळेतून व इतर मान्यताप्राप्त परिचर्या शाळेतून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांमधून पदाच्या सेवा प्रवेश नियमानुसार विहित केलेली अर्हता,अटी व शर्ती धारण करीत असलेल्या उमेदवारांमधून त्यांच्या गुणवत्तेनुसार निवडयादी तयार करण्यात येईल. उमेदवारास उच्च माध्यमिक शालांत परिक्षेमध्ये (12 वी) किमान 65% गुण व जनरल नर्सिंग मिडवायफरी डिप्लोमामध्ये किमान 55% गुण असणे आवश्यक आहे. सदर उमेदवारांची उच्च माध्यमिक शालांत परिक्षा (12 वी) व जनरल नर्सिंग मिडवायफरी डिप्लोमा या दोन्हीमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या सरासरीनुसार व निवडीच्या निकषानुसार निवडयादी तयार करण्यात येईल.

<u>निवडीची कार्यपध्दती:-</u>

अ) **एकूण रिक्त पदांपैकी 90% पदे फक्त बृहन्मुंबई महानगरपालिका परिचर्या शाळेतून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांसाठी**

1. नमूद केलेल्या प्रवर्गातील उमेदवारांची जनरल नर्सिंग मिडवायफरी डिप्लोमाच्या उत्तीर्ण वर्ष व गुणवत्तेनुसार निवडयादी तयार करण्यात येईल.
2. सर्व प्रवर्गातील उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांची खुल्या प्रवर्गाचे उमेदवार म्हणून निवड करण्यात येईल
3. खुल्या पदासाठी निवड झालेली असेल अश्या उच्च गुणवत्ताधारक मागासवर्गाच्या उमेदवारांची खुल्या पदावर नेमणूक करण्यात येईल.
4. उमेदवार परिचर्या अभ्यासक्रमाचे कोणतेही वर्ष दुस-या किंवा तिस-या प्रयत्नात उत्तीर्ण झाला असल्यास त्या प्रत्येक

वर्षाच्या प्रत्येक प्रयत्नासाठी त्या-त्या वर्षाच्या एकूण गुणातून प्रत्येकी 10 गुण वजा करण्यात येतील. तीनपेक्षा अधिक प्रयत्नात परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवाराला भरतीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

ब) **एकूण रिक्त पदांपैकी 10% पदे बृहन्मुंबई महानगरपालिका व इतर मान्यताप्राप्त परिचर्या शाळेतून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांसाठी**

1) उमेदवारास उच्च माध्यमिक शालांत परिक्षेमध्ये (12 वी) किमान 65% गुण व जनरल नर्सिंग मिडवायफरी डिप्लोमामध्ये किमान 55% गुण असणे आवश्यक आहे. सदर उमेदवारांची उच्च माध्यमिक शालांत परिक्षा (12 वी) व जनरल नर्सिंग मिडवायफरी डिप्लोमा या दोन्हीमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या सरासरीनुसार व निवडीच्या निकषानुसार निवडयादी तयार करण्यात येईल.

2) उमेदवार परिचर्या अभ्यासक्रमाचे कोणतेही वर्ष दुस-या किंवा तिस-या प्रयत्नात उत्तीर्ण झाला असल्यास त्या प्रत्येक वर्षाच्या प्रत्येक प्रयत्नासाठी त्या-त्या वर्षाच्या एकूण गुणातून प्रत्येकी 10 गुण वजा करण्यात येतील. तीनपेक्षा अधिक प्रयत्नात परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवाराला भरतीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

3) सर्व प्रवर्गातील उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांची खुल्या प्रवर्गाचे उमेदवार म्हणून निवड करण्यात येईल. मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गामध्ये भरतीकरीता अर्ज करण्याची मुभा राहील.

4) खुल्या पदासाठी निवड झालेली असेल अश्या उच्च गुणवत्ताधारक मागासवर्गाच्या उमेदवारांची खुल्या पदावर नेमणूक करण्यात येईल.

<u>सर्वसाधारण अटी:</u>

1) रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार आणि आवश्यकतेनुसार नेमणुका करण्यात येतील. तथापि निवडयादी कोणत्याही वेळी पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत.

2) जाहिरातीमध्ये दिलेल्या पदांची संख्या आणि अनुशेष बदलण्यासापेक्ष आहे.

3) वैयक्तिक महितीपत्र (BIO-DATA) विहित नमुन्यात स्वहस्ताक्षरात सर्व दृष्टीने पूर्ण असावेत. विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

4) अलिकडच्या काळात काढलेले पारपत्र आकारातील उमेदवाराचे छायाचित्र त्यांच्या स्वाक्षरीसह अर्जावर नमूद केलेल्या ठिकाणी चिकटवावे. त्या छायाचित्राच्या दोन अतिरिक्त प्रती पुढील निवड प्रकियेसाठी उमेदवाराजवळ ठेवणे आवश्यक आहे.

5)अर्जासाठी वापरण्यात येणारे कागद चांगल्या प्रतीचे (छायांकित प्रतीसाठी वापरण्यात येणा-या) ए 4 आकारातील असावे.

6) उमेदवारांनी स्वत: निश्चित करावयाचे आहे की, ते आवेदित पदांच्या सर्व अर्हता व अटी पूर्ण करतात. उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल. नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल.

7) उमेदवाराने राहण्याच्या ठिकाणाचा दाखला देणे आवश्यक आहे. उदा. वीजेचे बील

**8)पत्रव्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट व पूर्ण असावा (पिनकोडसह). उमेदवाराने दूरध्वनी/भ्रमणध्वनी अर्जात नमूद करावा.**

**9)टपालाद्वारे पाठविलेले अर्ज विहित मुदतीत अर्ज स्विकारण्याच्या ठिकाणी प्राप्त झाले नाहीत किंवा उशिरा प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.**

**10) पोस्टाच्या विलंबामुळे कोणतीही माहिती प्राप्त होण्यास किंवा कळविण्यास विलंब झाला तर त्याची जबाबदारी बृहन्मुंबई महानगरपालिकेवर राहणार नाही.**

11) इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदाकरीता विचार केला जाणार नाही.

12) उमदेवारांनी जन्मदाखला, शाळा सोडल्याचा दाखला, शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका, व्यावसायीक अर्हता, सक्षम अधिका-यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र, जात वैधतेचे प्रमाणपत्र, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे

प्रमाणपत्र ( 31 मार्च 2018 पर्यंतचे), असल्यास अनुभवाचे प्रमाणपत्र, नेमणुक पत्र यांच्या मुळ प्रती व सांक्षाकित झेरॉक्स प्रतीसह उपस्थित रहावे. विवाहित महिला उमेदवारांनी विवाहनोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्यानंतरचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहित महिला विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात .

13) उमेदवारास नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या गुन्ह्यात शिक्षा झाली असल्यास तो/ती निवडीसाठी अपात्र ठरेल. उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी, न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास, शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्याबाबतचा तपशील देणे आवश्यक आहे.

14) निवड झालेल्या उमेदवारांना संबंधित पदावर नियुक्ती करण्यापूर्वी सदर पदाच्या एक महिन्याच्या वेतनाएवढी रोख रक्कम अनामत रक्कम म्हणून भरावी लागेल. किंवा तशा अर्थाचे (आशयाचे) बंधपत्र सादर करावे लागेल. उमेदवाराने सुरक्षा रक्कम भरुन सुध्दा मनपामध्ये नेमणूक न स्विकारल्यास किंवा परिविक्षाधीन कालावधीमध्ये काही कारणास्तव बडतर्फ केल्यास त्यांना भरलेली अनामत रक्कम परत मिळण्याचा हक्क रहाणार नाही.

15) उमेदवारांना प्रमाणपत्रे पडताळणीसाठी नियोजित स्थळी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

16) निवड झालेल्या उमेदवारांची मुंबई मनपाच्या कार्यक्षेत्रातील मनपाच्या कोणत्याही वैद्यकिय संस्थेमध्ये नियुक्ती करण्यात येईल. सदर जाहिरातीत नमूद केलेली परिचारीकांची रिक्त पदे ही बृहन्मुंबई महानगरपालिकेतील प्रमुख रुग्णालये,विशेष रुग्णालये, उपनगरीय रुग्णालये व प्रसुतिगृहे यांच्या आस्थापनेवरील खुला व आरक्षणांतर्गत असल्याने नियुक्तीनंतर उमेदवाराला नियुक्त केलेल्या आस्थापनेवर जाणे बंधनकारक राहील.

17) निवड प्रकिया सुरु झाल्यानंतर किंवा कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती, प्रमाणपत्रे, कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

18) निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम 1989 तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम 1999 लागू होतील.

19) जर उमेदवार नियुक्ती आदेश स्विकारल्याच्या दिनांकापासून 07 दिवसाच्या कालावधीत नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाला नाही, तर त्याची सेवा आपोआप संपुष्टात येईल.

20) सदर भरती अंतर्गत नियुक्ती तीन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल व तीन वर्षानंतरचे

सेवासातत्य उमेदवारांच्या परिविक्षाधीन कालावधीतील कामगिरीवर अवलंबून असेल.

21)उमेदवार नियुक्तीनंतर त्या आस्थापनेवर कमीत कमी 3 वर्षाच्या कालावधीसाठी असेल. नियुक्तीपूर्वी अथवा नियुक्तीनंतर आस्थापना बदलण्याकरीता म.न.पा. अधिकारी अथवा राजकीय अधिका-यांकडून वैद्यकीय कारणाव्यतिरिक्त इतर कारणास्तव आस्थापना बदलीसाठी दबाव आणल्यास उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

22) विजा(अ), भज(ब), भज(क), भज(ड) या प्रवर्गातील आरक्षण त्या-त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास आंतर परिवतर्नीय आहे.

23) अज व अजा प्रवर्गातील उमेदवार वगळता अन्य मागासप्रवर्गातील उमेदवारांनी ते उन्नत आणि प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिका-यांनी दिलेले नविनतम प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेअर – 31 मार्च 2018 पर्यंतचे ) नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

24) आरक्षित पदावर निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवाराने नियुक्ती नंतर जात वैधता प्रमाणपत्रासाठी संबंधित जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर करावा. संबंधित जात पडताळणी समितीने दिलेली पोच पावती नियुक्ती प्राधिका-यास सादर करणे आवश्यक असून, सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

25) परिपत्रक क्र.एमबीसी/4985, दि.2/5/2017 अन्वये जे मागासवर्गीय उमेदवार नियुक्तीच्या वेळेस जात वैधता प्रमाणपत्र सादर करणार नाहीत, अशा कर्मचा-याने जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त होण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करुन, जाती दावा संबंधित पडताळणी समितीकडे सादर करुन पोचपावती वेळेत संबंधित आस्थापनाकडे सादर न केल्यास, तसेच त्यांनी सादर केलेले जातप्रमाणपत्र संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने अवैध ठरविल्याचे कळविल्यानंतर त्याक्षणी त्यांना कोणतीही सूचना न

देता, कोणतीही खात्यांतर्गत चौकशीची कारवाई न करता त्यांचे नियुक्तीचे आदेश रद्द करण्यात येतील, असे प्रतिज्ञापत्र विहित नमुन्यात संबंधित उमेदवारांकडून नियुक्तीच्या वेळेस सादर करुन घेण्यात येईल.

26) निवड झालेल्या उमेदवारांविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलिस स्टेशनकडून प्राप्त झाल्यानंतरच त्याची सदर पदावर नेमणूक केली जाईल.

27) नियुक्तीनंतर उमेदवारांना निवासस्थान उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी महापालिका प्रशासनाची नाही.

28) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर नविन 'परिभाषित अंशदान निवृत्ती योजना' लागू ठरेल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती योजना (म्हणजे मुंबई महानगरपालिका निवृत्ती वेतन नियम 1953) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

29) नि:समर्थ (अपंग) उमेदवाराने किमान 40 टक्के नि:समर्थत्व असल्याबाबतचे शासन निर्देशित सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र व त्याची प्रत सोबत आणावी.

30) शासकीय सक्षम प्राधिका-यांकडून किमान 40% नि:समर्थत्व असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केलेल्या व निवड झालेल्या नि:समर्थ (अपंग) उमेदवारांना मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय मंडळाकडे पाठविले जाईल व मुंबई महानगरपालिका वैद्यकीय मंडळाने सदर नि:समर्थ (अपंग) उमेदवार परिचारीका पदाचे कर्तव्य बजावण्यास शारिरीकदृष्टया पात्र ठरविल्यानंतरच त्यास प्रत्यक्ष नेमणूक देण्यात येईल.

| अ.क्र. | पदनाम | कर्तव्य | शारिरीक क्षमता/पात्रता |
|---|---|---|---|
| 1 | परिचारिका | रुग्णालयामध्ये वैद्यकिय अधिका-यांनी सूचित केल्यानुसार रुग्णांची सेवा करणे व त्यांच्या उपचाराकरीता सेवा सुविधा उपलब्ध करुन देणे. विविध आजारातील रुग्णांची रुग्णसेवा करणे. तसेच त्यांच्या उपचारादरम्यान औषधे व इंजेक्शन देणे. शस्त्रक्रीयेमध्ये मदत करणे, रुग्णसेवेचे विविध अभिलेख ठेवणे. उदा. Temprature, pulse rate, respiration rate, nourishment, Progress etc. | “One Leg” अपंगत्व मान्य आहे. परंतु परिचारीकांची कर्तव्ये व जबाबदारी पार पाडत असतांना त्यांनी Prosthesis चा वापर करुन जर परावलंबी राहत नसतील तर ते Accepted आहे |

31) उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियोक्त्यांचे ना हरकत प्रमाणपत्र असावे.

32) प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रीया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबवण्याचे

अधिकार माननीय महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहे.

33) समांतर आरक्षणांतर्गत अर्ज करु इच्छिणा-या उमेदवाराने समांतर आरक्षणाच्या दृष्टीकोनातून शासकीय

निदेशानुसार सक्षम प्राधिका-यांकडून प्राप्त केलेले प्रमाणपत्र व त्याच्या साक्षांकित छायांकित प्रती आणणे

आवश्यक आहे.

34)खेळाडू आरक्षणांतर्गतची पदे भरण्याकरीता महाराष्ट्र शासनाच्या दिनांक 01/07/2016च्या शासन निर्णय क्र.राक्रीधो-2002/प्र.क्र.68/क्रीयुसे-2 मध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार अत्युच्च गुणवत्ताधारक स्त्री व पुरुष खेळाडूंमधून भरण्यात येतील

35) परिचारीका या संवर्गाची अहर्ता व सर्व अटींची पुर्तता करणा-या उमेदवारांची गुणवत्तेनुसार तसेच रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार व मागासवर्गीयांच्या आरक्षणानुसार निवडयादी प्रसृत करण्यात येईल. निवड समितीने तयार केलेली निवडसुची एक वर्षासाठी किंवा नवीन भरती प्रक्रियेसाठी जाहिरात देण्यात येईल त्या दिनांकापर्यंत किंवा या दोन्हीपैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राहय ठरेल. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

<u>36) **अर्ज सादर करण्याची पध्दत**</u> ः-

- पात्रता निकषांची पूर्तता करणा-या उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज सर्व प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रतींसह जाहिरातीत नमूद केलेल्या ठिकाणी टपालाद्वारे किंवा वैयक्तिरित्या पाठविणे आवश्यक आहे. विहित मुदतीनंतर

प्राप्त झालेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

- उमेदवाराने परिपूर्ण अर्ज लिफाफामध्ये पाठवावेत. सदर अर्जावर व लिफाफावर या दोन्ही ठिकाणी " 90% अंतर्गत परिचारीका पदासाठी अर्ज" किंवा "10% अंतर्गत परिचारीका पदासाठी अर्ज" असे सुस्पष्ट अक्षरात लिहावे.

**<u>महत्त्वाच्या विशेष सूचना:</u>**

1. जर उमेदवाराने बृहन्मुंबईच्या 5 परिचर्या शाळांमध्ये अभ्यासक्रम उत्तीर्ण केला असल्यास, त्यांनी ज्या प्रवर्गातून अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला होता त्याच प्रवर्गातून अर्ज करावा.
2. यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले व पोष्टाने प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.
3. जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविले जाईल.
4. मध्यस्थ/ठक/मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत.
5. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रीया कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा. महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहे.
6. सेवायोजन कार्यालय/प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनी देखील या जाहिरातीनुसार अर्ज करणे आवश्यक आहे.

सही/-
कार्यकारी आरोग्य अधिकारी

# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

वैयक्तिक माहितीपत्र (BIO-DATA)

पदाचे नांव: परिचारिका

1) (अ) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) मराठीत ः:--------------------------------------------------

(ब) वडिलांचे/पतीचे संपूर्ण नांव ः:-----------------------------------------------------------

(क) विवाहापूर्वीचे संपूर्ण नांव (महिलाकरीता)ः:------------------------------------------

2) पत्ता व दूरध्वनी क्र. ---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

3) ★ लिंग ः: पुरुष स्त्री

4) जात: -------------------- पोटजात: ---------------- प्रवर्ग --------------------- जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र - आहे/नाही

5) अ) जन्मदिनांक ः: दिनांक ................ महिना ..............वर्ष .............................

ब) दिनांक रोजी असलेले वय ----------------वर्षे----------- महिने-------------दिवस

6) शैक्षणिक अर्हता:

| शैक्षणिक अर्हता | शालांत परिक्षा मंडळ/ विद्या-पिठाचे नाव | गुणांचा तपशिल | | | | उच्च माध्यमिक शालांत परिक्षेतील गुण | | उमेदवार किती प्रयत्नात परिक्षा उत्तीर्ण झाला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्राप्त गुण | पैकी | टक्केवारी | मराठी | इंग्रजी | |
| एचएससी | | | | | | | | |
| जनरल नर्सिंग मिडवायफरी | | प्रथम वर्ष | | | | | | |
| | | द्वितीय वर्ष | | | | | | |
| | | तृतीय वर्ष | | | | | | |
| | | एकूण | | | | | | |

*कृमाप*

7) निःसमर्थ (अपंग) उमेदवार - 1) चलनचलन विषयक विकलांगता

.निःसमर्थ असल्यास 40% अस्थिव्यंग निःसमर्थत्वाचे सक्षम प्राधिका-यांच्या प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत जोडावी

8) उमेदवार खेळाडू आरक्षणांतर्गत भरतीसाठी राहू इच्छित आहे का ?           होय / नाही

9) संगणकविषयक ज्ञान: MS-CIT किंवा शासनाने विहित केलेल्या संगणकविषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र: आहे / नाही

10) स्थानिक पोलीस ठाण्याचा संपूर्ण पत्ता (पिनकोडसह) ---------------------------------------------------

11) उंची:-------फुट-------इंच, वजन----------------किं.ग्रॅम, शरीराची ठेवण - किरकोळ / मध्यम / सुदृढ

वर्ण---------------- नेत्र वर्ण ---------------- वैयक्तिक खूण -----------------

12) उमेदवार सध्या नोकरी करीत आहे किंवा नाही ? असल्यास त्याबाबतचा तपशिल: होय / नाही

13)उमेदवारांविरुध्द पोलीस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित / प्रस्तावित आहे का ? असल्यास त्याबाबतचा तपशिल द्यावा)

उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? - होय/नाही

14)शिक्षा झाली असल्यास त्याचा तपशिल नमूद करावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडावी

15) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नविनतम प्रमाणपत्र -आहे / नाही

'मी प्रतिज्ञापूर्वक असे जाहिर करतो/ करते की वरील माहिती जाणीवपुर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणीक अर्हतेनुसार मी पात्र आहे. यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार रहाणार नाही. अर्जाव्दारे दिलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास बृहन्मुंबई महानगरपालीका माझ्या विरुध्द कायदेशीर कारवाई करु शकते याची मला जाणीव आहे. '

आपला/ आपली विश्वासू,

अर्जदाराची सही/-

(अर्जदाराचे नांव)